www.aiche.org/ccps

# Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

## सुटीतील कामकाज

नोव्हेंबर 2013








सुटीच्या दिवसांत प्रक्रीया उद्योगांत काय होते? अनेक कारखाने सुटीच्या दिवसात कारखाना बंद ठेवतात किंवा कामकाज कमी करतात. प्रक्रीया थांबविलेल्या किंवा बंद केलेल्या असताना उपकरणे त्यांच्या नियमित स्थितीत असतील असे नाही आणि शक्यता आहे की साठा टाक्यांमध्ये किंवा पात्रांमध्ये घातक पदार्थ शिल्लक असू शकतात. बंद असलेले उपकरण तपासणीसाठी किंवा देखभालीसाठी उघडले जाऊ शकते. देखभाल करणारे आणि कंत्राटी कामगारांची संख्या नियमित कामगारांपेक्षा जास्त असू शकते. सुटीनंतर प्रक्रीया पुन्हा सुरु होतात, काही वेळा बंद असतानाच्या काळात केलेल्या सुधारणांसह.

काही कारखाने सुटीच्या दिवशी चालूच ठेवतात पण कमी कर्मचारी ठेवून, कमी महत्वाची कामे प्रलंबित केली जातात व जास्तीत जास्त लोकाना सुटी त्यांच्या कुटुंबियांबरोर घालवण्याची संधी देतात. मोजकेच व्यवस्थापक व तांत्रिक कर्मचारी कामावर देखरेख करण्यासाठी वा समस्या सोडवण्यासाठी उपलब्ध असू शकतात.

## आपण काय करू शकता?

➔ प्रक्रीयेतील धोक्यांना सुटी नसते हे ध्यानात घ्या आणि . प्रक्रीया सुरक्षेवर नियमित नेहमी लक्ष ठेवा.

➔ सुटीवर असताना तुमचे कामाचे वेळापत्रक लक्षात ठेवा, पुरेशी झोप घ्या व कारखान्यात परतल्यावर कामासाठी सज्ज रहा.

➔ सुटीच्या दिवशी किंवा साप्ताहीक सुटीच्या दिवशी आवश्यकतेनुसार कामासाठी उपलब्ध रहा. तुमचे काम करण्यासाठी दुसऱ्याला अतिरिक्त काम करावे लागू देऊ नका. त्यामुळे अतिश्रांत सहकामगारास अपघात किंवा दुखापत होण्याची जोखीम राहील.

➔ चालू असलेल्या प्रक्रीयांचे विस्मरण होऊ देऊ नका, जरी त्या स्थगित असल्या तरी, जसे पूर्ण रिफ्लक्सवर असलेले उर्ध्वपतन संयंत्र. आवश्यक नोंदी ठेवा आणि प्रक्रीयेत काही विसंगती आढळल्यास अशा प्रक्रीयांवर बारीक नजर ठेवा.

➔ सुटीसाठी कारखाना बंद असला तरीही साठा टाक्या किंवा प्रक्रीया पात्रांमध्ये घातक रसायने भरलेली असू शकतात हे लक्षात ठेवा. या टाक्या व पात्रे नियमितपणे तपासा.

➔ तुम्हाला एखाद्या समस्येची शंका आल्यास व्यवस्थापकास किंवा अभियंत्यास बोलावण्यात कुचराई करू नका. समस्या जटील होण्याची वाट पाहू नका. सुटीच्या दिवशीसुध्दा तुम्हाला मदत करणे ही त्यांची जबाबदारी आहे!

➔ सुटीच्या दिवशी कारखाना बंद असताना जर देखभालीची किंवा तपासणीची कामे कंत्राटी कामगार करणार असतील तर ते तुमच्या कारखान्यातील कंत्राटी कामगार सुरक्षा पध्दतींनुसार कामे करतात याची खात्री करा.

➔ सुटीनंतर उपकरणे चालू करताना योग्य पध्दतींचा अवलंब करा. उपकरण तयार असल्याची आणि त्यावर काही दुरुस्ती किंवा बदल केलेले असल्यास वापरापूर्वीची सुरक्षा चाचणी घेतली असल्याची खात्री करा.

**सुटी म्हणजे मनमुराद आनंदाचे क्षण, पण कार्यस्थळी सुरक्षित कामाचा आनंद!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.